जाक्र/उमाशि-१/इ.११वीप्रवेश/२०१३-१४
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
यांचे कार्यालय
दिनांक : - 9 FEB 2014

प्रति,
प्राचार्य/मुख्याध्यापक,
उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविदयालये,
पुणे शहर व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्र

विषय :- **इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशासंदर्भात कॉलेजची प्रवेश क्षमता व इतर माहितीची नोंदणी करण्याबाबत.**

सन २०१४-२०१५ मधील इ. ११ वी केंद्रीय प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने होणार आहे, हे आपणास विदीत आहेच. यासंदर्भात पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविदयालये यांची एकूण विदयार्थी प्रवेश क्षमता, विषयनिहाय प्रवेश क्षमता, शाळा/कॉलेजनिहाय, शाखा व माध्यमनिहाय अनुदानित व विनाअनुदानित स्वतंत्र भरावयाची आहे. **ही माहिती अत्यंत महत्वाची असल्याने या माहितीच्या आधारे विदयार्थ्यांची गुणवत्ता यादी व त्यानुसार प्रवेश प्रक्रिया होणार असल्याने सदरची माहिती अचूक व वस्तुनिष्ठ असणे अपेक्षित आहे. ही माहिती भरताना संबंधीत शाळेच्या प्रमुखांनी / प्राचार्यांनी खालील सूचनांचा गांभीर्याने अवलंब करावा.**

१. माहिती भरण्यासाठी सन २०१३-२०१४ ची सेवकसंच निश्चितीची प्रत सोबत आणावी. (अनुदानित व विनाअनुदानित शाखा व तुकडयासह).

२. ऑनलाईन फॉर्म भरताना संस्थेचे नाव, कॉलेजचे पूर्ण नाव व कॉलेजचे प्रसिध्द नाव, कॉलेजचा पत्ता, ई-मेल प्राचार्यांचा पत्ता, मोबाईल क्रमांक, तंत्रसहाय्यक व प्रवेश प्रक्रिया प्रमुखांचे नाव मोबाईल क्रमांक व ई-मेल या बाबतची अचूक माहिती त्यात नमूद करावी.

३. अनुदानाच्या प्रकारानुसार व माध्यमानुसार कॉलेजचा कोड ऑनलाईन पध्दतीमध्ये आपोआप तयार होणार असल्याने या बाबतची माहिती भरताना गांर्भीयाने लक्ष दयावे.

४. कॉलेज बाबतची माहिती सेवकसंचानुसार ऑनलाईन भरण्यापूर्वी एका कागदावर तयार करुन ठेवावी. त्यात शाखा, अनुदान प्रकार, माध्यम प्रकार, यासंदर्भातील सर्व माहितीचा समावेश असावा. शाळा/कॉलेज अल्पसंख्याक असल्याचे अल्पसंख्याक प्रमाणपत्राचा ऑनलाईन माहिती भरताना उल्लेख करण्यात यावा. ज्या शाळांना इनहाऊस कोटा आहे, त्या शाळा/कॉलेजच्या प्रमुखांनी इन हाऊस कोटयाबाबतचा उल्लेख ऑनलाईन फॉर्म भरताना करावा.

२..

५. शाखानिहाय कॉलेजमध्ये शिकविण्यात येणारे विषय तसेच व्दिलक्षी अभ्यासक्रमाची विषयनिहाय अनुदानित व विनाअनुदानित स्वतंत्र प्रवेश क्षमता इत्यादी बाबींचा समावेश त्यात करावा.

६. केंद्रीय ऑनलाईन प्रवेश पध्दतीमधून गृहविज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, एम.सी.व्ही.सी.अभ्यासक्रम, रात्र कनिष्ठ महाविदयालय व उर्दू / हिंदी कनिष्ठ महाविदयालय यांना वगळण्यात आलेले आहे. सदर कनिष्ठ महाविदयालयांचे प्रवेश कनिष्ठ महाविदयालयस्तरावर ऑफलाईन पध्दतीने होतील अशा कनिष्ठ महाविदयालयांना ऑनलाईनसाठी रजिस्ट्रेशन करण्याची आवश्यकता नाही.

खाली दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे त्या त्या झोनमधील शाळा/कॉलेज प्रमुखांनी गरवारे ./ कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे- उपस्थित रहावे.

**वेळापत्रक**

| अ.न | झोन क्रमांक | झोनचे नाव | ऑनलाईन पध्दतीने भरावयाचा कॉलेज नोंदणी करण्यासाठीचा दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | १ | पुणे शहर | १७.२.२०१४ | ११.०० ते २.०० |
| २ | ४ | सिंहगड रोड | १७.२.२०१४ | २.३० ते ५.३० |
| ३ | ५ | कॅम्प व येरवडा | १८.२.२०१४ | ११.०० ते ५.३० |
| ४ | २ व ३ | कोथरुड/ स्वारगेट,पर्वती व धनकवडी | २०.२.२०१४ | ११.०० ते ५.३० |
| ५ | ७ | शिवाजीनगर, औंध व पाषाण | २४.२.२०१४ | ११.०० ते ५.३० |
| ६ | ८ | पिंपरी-भोसरी | २५.२.२०१४ | ११.०० ते ५.३० |
| ७ | ९ | चिंचवड-निगडी | २६.२.२०१४ | ११.०० ते ५.३० |
| ८ | ६ | हडपसर | २८.२.२०१४ | ११.०० ते ५.३० |

टिप : सर्व संबंधित झोन प्रमुखांनी सकाळी १०.३० वाजता गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे-- या ठिकाणी उपस्थित रहाणे आवश्यक आहे. आपआपल्या झोनमधील समाविष्ट सर्व कनिष्ठ महाविदयालयांची माहिती भरुन घ्यावयाची जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.

(सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१